**विषय:- महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ मधील कलम ४४-अ अन्वये खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनाकरिता "औद्योगिक अकृषिक वापर सहाय्यभूत समिती"गठीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**महसुल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: एनएपी-२०१५/प्र.क्र.२८/टी-१**

१ ला मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

तारीख: ३१ मार्च, २०१५

## प्रस्तावना

राज्यामध्ये गुंतवणुकीच्या प्रमाणामध्ये वाढ करणे व औद्योगिक विकासाला चालना देणे इ.बाबींकरिता "मेक इन महाराष्ट्र" हे अभियान हाती घेण्यात आले आहे.या अभियानाच्या अनुषंगाने राज्यात उद्योगांना वाढीसाठी / विकासाकरिता आवश्यक असणाऱ्या घटकांची कारणमिमांसा करुन विविध स्तरावर होणारा विलंब टाळण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यासाठी शासन विशेष प्रयत्न करित आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये तयार करण्यात आलेल्या प्रारुप अथवा अंतिम विकास योजना अथवा प्रादेशिक योजना यात औद्योगिक वापर विभागामध्ये दर्शविण्यात आलेल्या क्षेत्रावर महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ मधील कलम ४४-अ नुसार खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनाकरिता अथवा विशेष वसाहत प्रकल्पाकरिता अकृषिक परवानगी घेण्याची आवश्यकता नाही अशी सुधारणा महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ मध्ये वर्ष १९९४ व वर्ष २००५ मध्ये यापुर्वी करण्यात आली आहे.

तथापि, या सुधारित तरतुदींचा विशेष लाभ औद्योगिक प्रकल्प अथवा उद्योग उभारणी करणाऱ्या उद्योजकांनी मागील दोन दशकांमध्ये घेतला नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.याची कारणमिमांसा केली असता कलम ४४-अ मधील तरतुदीनुसार अकृषिक वापर करु इच्छिणाऱ्या उद्योजक अथवा विकासक यांनी सदर जमीन भुसंपादनाखाली येत नसल्याबाबत, रेल्वे मार्गापासुन तीस मीटर अंतराच्या आत अथवा उच्च व्होल्टता पारेषण तारमार्गापासुन पंधरा मीटर अंतराच्या आत येते किंवा कसे याबाबत तसेच केंद्रशासन, राज्यशासन किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरण किंवा सांविधानिक प्राधिकरणाकडुन करण्यात आलेला कोणताही कायदा, नियम, विनिमय अथवा आदेश यांच्या तरतुदींचे उल्लंघन करीत नाही या व काही इतर बाबी विषयी स्वत: खात्री करुन घेणे अपेक्षित आहे.

संबंधित उद्योजकांना सदर मुद्यांबाबत खात्री करण्याकरिता आवश्यक माहिती विविध शासकिय विभागांकडुन उपलब्ध होण्यासाठी होणाऱ्या विलंबामुळे तसेच सदर मुद्यांविषयी स्वखात्री करुन औद्योगिक वापर सुरु करणे जोखमीचे वाटत असल्यामुळे अनेक उद्योजक कलम ४४-अ अन्वये परस्पर औद्योगिक वापर सुरु करण्यास इच्छुक नसतात. व त्यामुळे बहुतांश उद्योजक महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ मधील कलम ४४ अन्वये निश्चित सर्वसाधारण कार्यपध्दतीनुसार सक्षम महसुल अधिकाऱ्यांकडुन अकृषिक परवानगी घेण्याची कार्यपध्दती अवलंबतात.राज्यशासनाने कलम ४४-अ अन्वये खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी अकृषिक वापराबाबत सुलभीकरण करुनही उद्योजक या तरतुदीचा वापर करत नसल्याने अनेक प्रकरणी उद्योग उभारणीस विलंब होउन प्रकल्पाची किंमत वाढणे, वित्तिय संस्थांकडुन अपेक्षित आर्थिक सहाय्य न मिळणे, पर्यायाने राज्याच्या औद्योगिक वाढीवर व विकासावर परिणाम होणे इत्यादी प्रश्न निर्माण होतात.

या पार्श्वभुमीवर उद्योजकांना कलम ४४-अ च्या तरतुदीनुसार परस्पर औद्योगिक वापर सुरु करणे सुलभ व्हावे व त्याकरिता आवश्यक अधिकृत माहिती त्यांना एकखिडकी तत्वाच्या अंतर्गत तातडीने उपलब्ध व्हावी या दृष्टीने जिल्हा स्तरावर "औद्योगिक अकृषिक वापर सहाय्यभुत समिती"(Industrial Non- agriculture Use Facilitation Committee) गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.या कामी विचाराअंती शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

## शासन निर्णय

**महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ मधील कलम ४४-अ अन्वये खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनाकरिता जमिनीचा अकृषिक वापर सुलभ करण्याकरिता उद्योजकास आवश्यक अधिकृत माहिती विविध विभाग व प्राधिकरण यांच्याकडुन एकखिडकी संरचनेंतर्गत एकत्रितरित्या उपलब्ध होणेकरिता जिल्हा स्तरावर अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे "औद्योगिक अकृषिक वापर सहाय्यभुत समिती"(Industrial Non- agriculture Use Facilitation Committee) गठीत करण्यात येत आहे.**

पुढे पान नं. २ वर. . .

**२. औद्योगिक अकृषिक वापर सहाय्यभुत समितीचे सदस्य पुढीलप्रमाणे राहतील-**

| | |
|---|---|
| **अध्यक्ष** | अप्पर जिल्हाधिकारी |
| **सदस्य** | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी नामनिर्देशित केलेला उपमुख्य कार्यकारी अधिकारी दर्जाचा अधिकारी |
| **सदस्य** | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ |
| **सदस्य** | सहाय्यक संचालक नगररचना, जिल्हा शाखा कार्यालय |
| **सदस्य** | जलसंपदा विभागाचा कार्यकारी अभियंता यापेक्षा कमी दर्जा नसलेला जिल्हास्तरीय अधिकारी |
| **सदस्य** | जलसंधारण विभागाचा कार्यकारी अभियंता यापेक्षा कमी दर्जा नसलेला जिल्हास्तरीय अधिकारी |
| **सदस्य** | जिल्हा उद्योग अधिकारी तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र |
| **सदस्य** | महापारेषण व महावितरण या कंपन्यांचा कार्यकारी अभियंता यापेक्षा कमी दर्जा नसलेला जिल्हास्तरीय अधिकारी |
| **सदस्य** | सार्वजनिक बांधकाम विभागाचा कार्यकारी अभियंता यापेक्षा कमी दर्जा नसलेला जिल्हास्तरीय अधिकारी |
| **सदस्य** | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी |
| **सदस्य** | उप वन संरक्षक |
| **सदस्य सचिव** | निवासी उपजिल्हाधिकारी |

समितीच्या अध्यक्षांना आवश्यकतेनुसार इतर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना समितीच्या सभेसाठी आमंत्रित करण्याची मुभा असेल.

## ३. समितीची कार्यकक्षा व कार्यपध्दती:

**i)** सदर समितीची बैठक प्रत्येक महिन्यामध्ये दोन वेळा होईल.

**ii)** महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ चे कलम ४४-अ नुसार औद्योगिक अकृषिक वापर करु इच्छिणाऱ्या उद्योजक यांनी ज्या ज्या विषयांबाबत माहिती आवश्यक असेल त्याचा उल्लेख करुन सदस्य सचिव यांचेकडे १० प्रतीत अर्ज सादर करावेत.

**iii)** सदर अर्ज सदस्य सचिवांनी स्विकारल्यानंतर अर्जदारांना आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित विभागास सदर अर्ज त्याच दिवशी अथवा जास्तीत जास्त पुढील दिवशी अग्रेषित करण्यात यावेत.पुढील दिवशी कार्यालयीन सुट्टी असल्यास त्यापुढील दिवशी सदर अर्ज अग्रेषित करण्यात येईल.

**iv)** संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यास वरीलप्रमाणे सदस्य सचिवांमार्फत उद्योजकाचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सदर वस्तुनिष्ठ माहिती न चुकता पुढील पंधरा दिवसांच्या आत सदस्य सचिवांकडे पाठवावी.

**v)** सदस्य सचिव यांनी अध्यक्ष यांच्या निर्देशानुसार समितीच्या बैठकांचे वेळोवेळी आयोजन करावे.सदर बैठकीस संबंधित उद्योजक अथवा त्यांचे प्रतिनीधी यांना ही उपस्थित राहण्याची सुचना करण्यात यावी.

**vi)** सदर बैठकीत संबंधित विभागाद्वारे सदस्य सचिवांकडे देण्यात आलेली माहिती उद्योजकास अधवा त्याच्या प्रतिनीधीस उपलब्ध करुन द्यावी..

**vii)** अर्जदार उद्योजकास स्वत: अथवा प्रतिनिधीमार्फत समितीच्या बैठकीस उपस्थित राहणे शक्य नसल्यास उद्योजकास सदर माहिती ई मेलद्वारे पाठवावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.